REGISTERED No. B 3436.




# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १३ पुणें, बुधवार तारीख १६ जुलै १९४७ अंक २९

★ प्रगति हीच लोकप्रियता ★
१९४६ साल सर्व दृष्टींनीं खडतर असतांही अनेक अडचणींना तोंड देऊन

वेस्टर्न इंडिया

नें

नवीन काम २ कोटींवर पूर्ण करून अभिमानास्पद प्रगति केली. निश्चित लोकप्रियतेची ही खूण आहे. आपले विमे याच कंपनींत उतरा व स्वास्थ्य मिळवा.

माहितीसाठी लिहा अथवा भेटा. ★ एजन्सीसाठी चौकशी करा.

—मॅनेजरः—

वेस्टर्न इंडिया लाइफ इन्शुअरन्स कंपनी लि.,
सातारा.

पुणें शाखा कचेरीः—कर्वे वाडा, लक्ष्मी पथ, बेलबाग.




साठे बिस्किटें

ठराविक पुरवठा नियमितपणें दरमहा होत आहे. आतां माल सांचवून ठेवूं नका.

प्रचलित सरकारी नियंत्रणामुळें बिस्किटांकरतां लागणारा योग्य तो कच्चा माल मिळणें अशक्य झालें आहे. तथापि त्यांतल्या त्यांत चांगला माल मिळेल तोच वापरण्याचा आमचा सतत प्रयत्न असतोच. तरी व्यापाऱ्यांनीं बिस्किटें जास्त दिवस सांचवून न ठेवतां शक्य तितका ताजा माल ग्राहकांस देण्याची खबरदारी घेणें अधिक चांगलें !

साठे बिस्किट कंपनी, पुणें १

-सर्व प्रांतांतील-
सुती – गरम – रेशमी
—खादीचें माहेरघर—

खादी मन्दिर

२६२, बुधवार पेठ,
ढमढेरे बोळाजवळ,
पुणें २

## विविध माहिती

**अधिक धान्य पिकवा**—रूरल डेव्हलपमेंट बोर्डाच्या प्रतिनिधींची एक परिषद मुंबई येथें भरविण्यांत आली होती. मुंबई सरकारचे शेतकी-मंत्री श्री. पाटील यांनीं या परिषदेंत भाषण करून, मुंबई प्रांत २ वर्षांत धान्याच्या दृष्टीनें स्वयंपूर्ण करण्यासाठी जनतेनें अधिक सहकार्य करावें अशी विनंती केली.

**पोलंड-रशिआ व्यापारी करार**—पोलंड आणि रशिआ यांच्यांत चालू असलेल्या व्यापारी वाटाघाटींची परिणति म्हणून मॉस्को येथें नव्या व्यापारी करारावर उभय पक्षांतर्फे सह्या करण्यांत आल्या.

**ब्रिटनचें ब्रह्मदेशाला कर्ज**—ब्रिटननें ब्रह्मदेशाला जून अखेर ४१ कोटी, ७० लाख पौंड कर्ज दिलें असल्याची माहिती कॉमन्स सभेंत सांगण्यांत आली.

**चिनी कम्युनिस्टांचे विरुद्ध मोहीम**—चीनचे अध्यक्ष मार्शल चँग-कै-शेक यांनीं चिनी कम्युनिस्टांचा नायनाट करण्यासाठीं चीनला आपल्या सर्व मनुष्यबळाचा व द्रव्यबळाचा उपयोग करावा लागेल असें मत व्यक्त केलें आहे.

**हिंदी डोमिनीअन स्टेटसचा कायदा**—हिंदुस्थानांत पाकिस्तान व हिंदुस्थान अशीं दोन वसाहतींचीं स्वराज्यें निर्माण करणार कायदा ब्रिटिश पार्लमेंट २० जुलैच्या आंत मंजूर करील असें ब्रिटिश सरकारला वाटत आहे.

**मद्रासमधील बस वहातूक**—आपल्या प्रांतांतील मोटारींची वहातूक राष्ट्रीय मालकीची करण्याच्या दृष्टीनें मद्रास सरकारनें ऑक्टोबर १९४७ पासून शहरांतील बस सर्व्हिस आपल्या ताब्यांत घेण्याचें ठरविलें. यासाठी मद्रास सरकाराला ६७ लाख रुपये खर्च येईल.

**कच्छमधील कंपनीला जबर दंड**—कराचीच्या आयात जकातीच्या कलेक्टरनें भुज या कच्छ संस्थानांतील, एका आयात करणाऱ्या कंपनीला ५० लाख रुपये दंड केला. या कंपनीनं विमानांतून ३० लाख रुपये किंमतीचें अमेरिकेंतील सोनें बिगर-परवाना आयात केलें होतें.

**ब्रिटनमधील मोटार वहातुकीला संकट**—ब्रिटनमधील मोटार टायर्सच्या कारखान्यांतून लवकरच अधिक प्रमाणांत टायर्स उत्पादन केल्या गेल्या नाहींत तर मोटारींची रस्त्यांवरील वहातूक नजीकच्या भविष्यकालांत थंडावण्याची भीति आहे.

**पॅरिसमधील अन्न परिषद**—पॅरिसमध्यें ८ जुलै पासून सुरू झालेल्या आंतरराष्ट्रीय अन्नपरिषदेला हिंदुस्थानतर्फे सहा जणांचें शिष्टमंडळ धाडण्यांत आलें आहे. शिष्टमंडळाचें नेतृत्व डॉ. के. एन्. काटजू यांच्याकडे आहे.

**सिंधमधील प्रदर्शनांत त्रावणकोर भाग घेणार**—सिंधचें सरकार पुढील महिन्यांत एक अखिल भारतीय औद्योगिक आणि व्यापारी प्रदर्शन भरविणार आहे. या प्रदर्शनांत त्रावणकोर संस्थान भाग घेणार आहे असें समजतें.

**मध्यप्रांतांतील स्थापत्यशास्त्राचें पहिलें कॉलेज**—मध्यप्रांताचे शिक्षणमंत्री श्री. एस. व्ही. गोखले यांच्या हस्तें प्रांतांतील पहिल्या स्थापत्य-शास्त्रीय कॉलेजचें उद्घाटन करण्यांत आलें. तूर्त हें कॉलेज जबलपूरपासून ५ मैलांवर असलेल्या रॉबर्टसन कॉलेजच्या इमारतींत चालू करण्यांत आलें आहे. खमारिआजवळ ३०० एकर जागा कॉलेजसाठी मुकर करण्यांत आली असून इमारतीच्या बांधकामाला लवकरच प्रारंभ होईल.


# दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

हेड ऑफिसः—पुणें शहर

शाखाः—पुणें लष्कर, बारामती, लोणावळा, बेलापूर रोड, ओझर ( जि. नाशिक ), खोपोली पे ऑफिसः


| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... ... | रु. १५,४३,८१० |
| विक्री झालेलें भांडवल | ... | रु. ७,९३,८१० |
| वसूल झालेलें भांडवल | ... | रु. ३,९६,२४५ |
| एकूण खेळतें भांडवल | ... | रु. ५५ लाखांचेवर |

चेअरमनः—श्री. के. वि. केळकर, M. A., LL. B. (वकील)

- गतवर्षी ऑर्डिनरी शेअर्सवर चार टक्के अधिक अर्धा टक्का करमाफ डिव्हिडंड दिलें.
- मुंबई, नगर, नाशिक, बंगलोर, अर्सीकेरी, बेळगांव, धारवाड, हुबळी, कोचीन, कालिकत वगैरे ठिकाणीं डिमांड ड्राफ्टस दिले जातात.
- बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

एन. एन. क्षीरसागर,
आर. बी. साळवेकर,
बी. ए., एलएल. बी.
मॅनेजिंग डायरेक्टर्स.





अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

# किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

# अर्थ

बुधवार, ता. १६ जुलै, १९४७




प्रो. वा. गो. काळे


संपादक :
श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## हिंदी भांडवलाच्या व पैशाच्या निर्गतीवर बंधनें

### रिझर्व्ह बँकेची उपाययोजना

नॉन-स्टर्लिंग गटांतील देशांकडे हिंदुस्थानांतील पैसा पाठविण्यावर रिझर्व्ह बँकेनें नियंत्रणें घातलीं असल्याचें जाहीर झालें आहे. हिंदी येण्याच्या वसुलीबाबत हिंदुस्थान सरकार व ब्रिटिश सरकार ह्यांच्या प्रतिनिधींमध्यें लंडन शहरीं वाटाघाटी चालू आहेत, परंतु त्यांतून हिंदुस्थानाच्या दृष्टीनें फायदेशीर अशी निष्पत्ती कितपत होईल, हें सांगतां येत नाहीं. ह्याचीं कारणें उघडच आहेत. अमेरिकन डॉलर्सचा तुटवडा जागतिक झाला आहे, म्हणजे अमेरिकन माल घेण्यासाठी डॉलर्स उपलब्ध करण्याचें पुरेसें साधन इतर देशांजवळ नाहीं आणि ग्रेट ब्रिटनला तर डॉलर्स मिळविण्यासाठी अमेरिकेचेंच कर्ज घेत रहावें लागत आहे. खुद्द ग्रेट ब्रिटनचा परराष्ट्रीय व्यापार पाहिला, तर त्याची आयात-निर्गत परिस्थिति समाधानकारक नाहीं; आयातीचे मानानें निर्गतींत सुधारणा दिसत नाहीं. त्याचाहि हिंदुस्थानास परराष्ट्रीय हुंडणावळ मिळण्यावर प्रतिकूल परिणाम होणें अपरिहार्य आहे. अशा परिस्थितींत, हिंदी लोकांच्या पैशाचा ओघ अनियंत्रितपणें हिंदुस्थानाबाहेर चालू देणें आपल्या देशाच्या हिताचें नाहीं. हिंदी पैसा बाहेर जाऊं देणें म्हणजे त्या प्रमाणांत परराष्ट्रीय चलन आणखी दुर्मीळ करणें; म्हणजेच परराष्ट्रांकडून माल आयात करण्याची आपली क्षमता कमी करणें होय. हिंदुस्थानाची फाळणी होऊन दोन स्वतंत्र नवीं राष्ट्रें आतां निर्माण होणार, त्याची भीति कांहीं भांडवलदारांस वाटत आहे. त्याचप्रमाणें, आपला पैसा हिंदुस्थानांतून बाहेर नेऊन ठेवल्यास तेथें तो अधिक सुरक्षित राहील अशी कित्येकांची कल्पना आहे. मोठ्या प्रमाणावर असें घडूं नये, परंतु वैयक्तिक गैरसोय मात्र होऊं नये, ह्या दृष्टीनेंच रिझर्व्ह बँकेनें नियंत्रणाची योजना केली आहे.

हिंदी नागरिकांना स्टर्लिंगमध्यें खातीं उघडावयाचीं असल्यास त्यांना रिझर्व्ह बँकेची पूर्व संमति आतां घ्यावी लागेल. हिंदुस्थानांत सध्या वास्तव्य करीत असलेल्या परदेशीय नागरिकांना आपल्या स्वतःच्या देशाच्या चलनांत खातीं उघडून तीं वापरतां येतील. अमेरिकन डॉलरला मात्र ही सवलत लागू नाहीं. लंडनमधील वाटाघाटी संपेपर्यंत हिंदुस्थानांतील भांडवल स्टर्लिंग गटांकडेसुद्धां जाऊं दिलें जाणार नाहीं. ज्यांना आपल्या कुटुंबीयांसाठी हिंदुस्थानाबाहेर पैसे धाडावयाचे असतील किंवा विम्याचे हप्ते भरावयाचे असतील, त्यांना तसें करण्यास मोकळीक आहे. दरमहा ३,३०० रुपयांपेक्षा जास्त रकम मात्र पाठवितां येणार नाहीं. प्रवाशांचे बाबतींतहि अशाच सवलती दिलेल्या आहेत. मोठ्या रकमा पाठविणें असल्यास, रिझर्व्ह बँकेकडे अर्ज करावा लागेल परंतु तो मंजूर होण्याचा संभव फारच कमी आहे. हिंदुस्थानांतून निवृत्त होणाऱ्या ब्रिटिश नोकरांसहि सवलती दिलेल्या आहेत. व्यापारविषयक देणीं पाठविण्यावर बंधनें नाहींत; त्याचप्रमाणें हिंदुस्थानांत व्यवहार करणाऱ्या कंपन्यांनीं आपल्या भागीदारांस नफ्याची रकम परदेशीं पाठविण्यास हरकत नाहीं. परंतु; अशा रकमांचा तपशील मागण्याचा रिझर्व्ह बँकेस अधिकार आहे. स्टर्लिंग गटांतील कोणत्याहि देशाचे रोखे विकत घेण्यासाठी आतां कोणालाहि परदेशीं पैसे रवाना करता येणार नाहींत.

---

### विमा एजन्सी बेकायदा रद्द केल्याबद्दल नुकसान

ओरिएंटल विमा कंपनीनें १४ सप्टेंबर १९२९ रोजीं सोराबजी धनजीभाई ह्यांची "गुजरातचे चीफ एजंट" ही नेमणूक रद्द केली, तेव्हां त्या चीफ एजंटांनीं मुंबई हायकोर्टांत दावा आणून आपली नेमणूक बेकायदा रद्द केल्याबद्दल कंपनीकडे नुकसानभरपाई मागितली आणि विमा कायद्याप्रमाणें रिन्युअल कमिशनचीहि मागणी केली.

न्यायमूर्ति छगला ह्यांनीं दाव्याचा निवाडा करतांना "कंपनीनें वादीस दिलेली ३½ महिन्यांची नोटीस अत्यंत अपुरी आहे; ती किमान २ वर्षांची तरी असावयास पाहिजे होती" असें सांगून वादीस ८२ हजार रुपये नुकसानभरपाई देवविली परंतु रिन्युअल कमिशनची मागणी मान्य केली नाहीं. अपिलांत हाच निवाडा कायम झाल्यावर प्रिव्हि कौन्सिलकडे अपील गेलें.

प्रिव्हि कौन्सिलनें नोटीशीची मुदत व नुकसानभरपाई ह्याबाबत खालच्या निवाड्यांशीं सहमत व्यक्त केलें परंतु "वादीनें १ जानेवारी १९४० रोजीं विमा कायद्याप्रमाणें एजंटाचा लायसेन्स काढलेला होता तो वादीची चीफ एजन्सी रद्द होण्यापूर्वी (३० डिसेंबर, १९२९) काढलेला होता आणि हें रद्द करणें करराच्या विरुद्ध असल्याचें ठरविण्यांत आलेलें आहे. तेव्हां वादी हा विमा एजंट असल्यानें त्यास रिन्युअल कमिशन मिळालेंच पाहिजे" असें सांगून त्याबाबत नुकसानभरपाई ठरविण्यासाठी प्रकरण परत हायकोर्टाकडे धाडलें.

त्याप्रमाणें, न्या. छगलांचे समोर पुनः दाव्याचें काम चाललें. "कायद्याच्या ४४ व्या कलमाप्रमाणें, वादीस मिळावयाच्या कमिशनमधून खर्च कापून घेतां येणार नाहीं किंवा सबएजंटांना दिलेल्या रकमा त्यांतून वजा टाकतां येणार नाहींत" असें सांगून, न्यायमूर्तींनीं १६ सप्टेंबर १९४१ ते ८ नोव्हेंबर १९४४ ह्या मुदतीच्या कमिशनची पूर्ण रकम वादीस देवविली. ही रकम ३,५०,००० रुपये असावी, असें वादी व प्रतिवादी ह्यांनीं आपसांत ठरविलें त्यास अनुसरून त्या रकमेचा हुकुमनामा करण्यांत आला. दाव्याचा खर्च कंपनीनेंच सोसावयाचा आहे. प्रारंभीं सांगितलेली ८२ हजारांची नुकसाभरपाई स्वतंत्र असल्यानें ती कायमच आहे.

---

**चीनमधील सोव्हिएट नागरिक**—चीनमधील जे रशिअन नागरिक सोव्हिएट रशिआंत येण्यास तयार असतील त्यांना तसें करण्याची परवानगी रशिअन सरकारनें दिली होती. तिचा फायदा घेऊन शांघायमधील ७ हजार रशिअन नागरिकांनीं आपलीं नांवें तेथील वकिलातींत नोंदविलीं आहेत.

# स्फुट विचार

## लंडनमधील हिंदी येण्याच्या वसुलीच्या वाटाघाटी

" ग्रेट ब्रिटन आपलें देणें पूर्णपणें देऊं शकणार नाहीं हें स्पष्टच आहे; तेव्हां पुढें केव्हांतरी हें देणें कमी रकमेवर तोडावें लागणारच. मग ही परिस्थिति आजच लक्षांत घेऊन धनको राष्ट्रांनीं येण्यांत कपात स्वीकारणें इष्ट होणार नाहीं काय ?" असा युक्तिवाद ब्रिटिश फडणवीस डॉ. डाल्टन ह्यांनीं कांहीं महिन्यांपूर्वी पुढें मांडला होता. त्या वेळेच्या स्थितीचे मानानें ब्रिटनची आजची स्थिति अधिकच खालावलेली आहे आणि " आम्ही कर्ज फेड करूं शकत नाहीं; काय करावयाचें तें करा " हा पूर्वीचा त्याचा सूर आतां बदलला आहे. ब्रिटनला आज जो माल आयात करावा लागत आहे, त्याच्या मोबदला स्वतःचा माल निर्गत करण्यास ब्रिटन केव्हांहि तयार आहे, परंतु केवळ जुनें देणें फेडण्यासाठी माल बाहेर पाठविण्याची त्याची तयारी नाहीं व त्याचें सामर्थ्यहि त्याचेपाशी नाहीं. अशा परिस्थितींत, जुनें देणें फेडण्याचें केवळ नाकारून भागणार नाहीं. धनको राष्ट्रांशीं तडजोड करून आयात-निर्गत चालू ठेवून, बंद पडलेलें खातें मर्यादित स्वरूपांत पुनः सुरू करण्याचें धोरणच त्या राष्ट्रास पत्करावें लागेल. बँकेचें एकाद्या कर्जदाराकडे बरेचसें येणें तुंबलें म्हणजे पूर्वीच्या कर्जाचा व्यवहार तूर्त बाजूस ठेवून आणि मर्यादित प्रमाणांत नवीन व्यवहार सुरू करून त्यांत जी कूस राहील तिचा विनियोग जुन्या व्यवहारांतील दोष नष्ट करण्याकडे केल्यानें बँक व कर्जदार ह्या दोघांचीहि सोय होते. तशाच प्रकारची सोय ब्रिटनला हवी आहे आणि म्हणून पूर्वीचें देणें सपशेल अमान्य करण्याची आज घाई करण्यास तो उत्सुक नाहीं.

## अमेरिकन प्रवाशांचा संचार सुरू होणार

अमेरिकन अर्थव्यवस्थेचें जगांतील स्थान जसें अग्रगण्य झालेलें आहे त्याचप्रमाणें अमेरिकन प्रवासीही पृथ्वीच्या पाठीवर आतां पुनः मनमुराद हिंडूं लागतील यांत शंका नाहीं. १९४७ च्या पहिल्या सहामाहींत अमेरिकन प्रवासी नागरिकांच्या संख्येंत खूपच वाढ झाली आहे. या वर्षी जवळ जवळ २॥ लाख अमेरिकन प्रवाशांना परदेश प्रवासाचे परवाने देण्यांत येतील असा अंदाज आहे. युद्धापूर्वी दरवर्षी सरासरी ६ लाख अमेरिकन प्रवासी देशपर्यटन करीत असत, आणि ते जवळ जवळ ५० कोटी डॉलर्स एवढी रक्कम परदेशांत खर्च करीत असत. प्रवासाच्या सोयी जशा वाढतील आणि अडचणी ज्या मानानें दूर होत जातील त्यामानानें येत्या कांहीं वर्षांत अमेरिकन प्रवासी परदेशांत १ अब्ज, ५० कोटी डॉलर्स खर्च करतील असा अंदाज खुद्द अमेरिकन सरकारी खात्यानेंच केला आहे. ही परिस्थिति लक्षांत घेऊन प्रवाशांची ने-आण करणाऱ्या कंपन्या पुढील तयारीला लागल्या आहेत. उत्तर अटलांटिक महासागरांतील प्रवासी बोटी दरवर्षी सरासरी ८० हजार प्रवासी नेतात-आणतात. लवकरच १ लाख, ५५ हजारांपर्यंत प्रवासी नेण्याची सोय करण्यांत येणार आहे. सध्या फक्त अमेरिकन विमानांतूनच दर आठवड्याला १,५०० प्रवासी युरोपला जातात. पण परदेशी विमान–कंपन्यांशीं सहकार्य करून ही संख्या २ लाखांपर्यंत वाढविण्याची योजना करण्यांत येणार आहे. मोटारीनें प्रवास करण्यांतच ज्यांना विशेष मौज वाटते, अशा अमेरिकन प्रवाशांसाठी नुसत्या युरोपांतच सुमारें २,५०० मोटारी नेण्यांत येतील असा अंदाज आहे. हिंदुस्थानांत येणाऱ्या अमेरिकन प्रवाशांसाठीं खाजगी व सरकारी रीत्या चांगल्या सोयी करण्यांत आल्या तर बराच अमेरिकन पैसा हिंदुस्थानांत खर्च होऊं शकेल, हें उघड आहे.

## खुद्द इंग्लंडमध्येंच कापडाची आयात !

ज्या जिनसांच्या उत्पादनाकरितां आणि निर्गतीकरितां ग्रेट ब्रिटन आजवर प्रसिद्ध आहे, त्या जिनसांची आयात करण्याची पाळी त्या देशावर आतां आली आहे. अमेरिकन कोळसा ब्रिटनमध्यें आयात होऊं लागला आहे आणि परदेशी कापडाची आयातहि सुरू झाली आहे. जपानकडून सुमारें ६½ कोटि वार कापड ब्रिटननें नुकतेंच आणवलें असून, त्याचें " फिनिशिंग " करून तें पुनः निर्गत करण्याची योजना आहे. जपानी कापडाची किंमत दुर्मिळ डॉलर्समध्यें द्यावी लागली असून, त्या कापडास लँकेशायरमध्यें पडणाऱ्या किंमतीपेक्षां २५% जास्त किंमत द्यावी लागली आहे. जर्मनीच्या रशियन विभागांतूनहि अशाच रीतीनें सुमारें ६० लक्ष वार कापड मिळविण्यांत आलें आहे, तें जसेंच्या तसेंच विक्रीसाठी उपलब्ध केलें जाईल.

## बेकार सुशिक्षितांस सरकारी सहाय

बेकार सुशिक्षितांस लहान प्रमाणावर उद्योग सुरू करण्यासाठी सहाय देण्याच्या मुंबई सरकारच्या योजनेचा तपशील प्रसिद्ध झाला आहे. यंत्रसामुग्री, इत्यादींची खरेदी व उभारणी, प्रारंभींचा तोटा, खेळतें भांडवल, इत्यादींसाठी सरकारी मदत दिली जाईल. प्रत्येक ग्रँटची रकम साधारणतः १ हजार रुपयांवर जाणार नाहीं व कांहीं विशिष्ट बाबतींत ती २ हजारांपर्यंत जाईल. दोन किंवा अधिक बेकार सुशिक्षितांनीं एकत्र उद्योग सुरू केला तर त्या प्रमाणांत ज्यास्त ग्रँट मिळेल. ग्रँटपैकी निम्मी रकम बिनपरतीची मदत म्हणून समजली जाऊन बाकीची रकम बिनव्याजी कर्ज समजलें जाईल आणि तें हप्त्यांनीं परत द्यावें लागेल. पहिला हप्ता कर्जाच्या नंतर १८ महिन्यांनीं सुरू होईल. ग्रँटसाठी ठराविक नमुन्याप्रमाणें अर्ज जॉ. रजिस्ट्रार फॉर इंडस्ट्रिअल कोऑपरेटिव्हज ॲंड व्हिलेज इंडस्ट्रीज, पुणें ह्या पत्त्यावर करावयाचा आहे.

## दि सेंट्रल म्युच्युअल लाइफ इं. कं. लि., मुंबई

वरील विमा कंपनीचा गेल्या वर्षाचा अहवाल व हिशेबाचे तक्ते आमचेकडे परीक्षणार्थ आले आहेत. अहवालाचे वर्षी कंपनीनें ६ लाखांचे वर नवें काम पुरें केलें, त्याच्या वार्षिक हप्त्यांची रकम ४० हजारांवर आहे. कंपनीच्या एकूण ७९ हजार रुपयांच्या उत्पन्नापैकी ७५ हजारांचें उत्पन्न हप्त्यांचें आहे. व्यवस्थेचा खर्च २८,६००रु. आला, त्यांत १,८००रुपयांच्या प्राथमिक खर्चाच्या बाकीचा समावेश होतो. आतां जिंदगीचे बाजूस प्राथमिक खर्चाची बाब उरलेली नाहीं. इतकें करूनहि खर्चाचें प्रमाण १०% पेक्षांहि खालीच आहे. १०% पेक्षा कमी खर्चाचे प्रमाण असणाऱ्या पांच सहाच हिंदी कंपन्या आहेत, त्यांत सेंट्रल म्युच्युअल आहे ह्या गोष्टीचा उल्लेख डायरेक्टरांच्या रिपोर्टांत अभिमानपूर्वक करण्यांत आला आहे. नव्या कामाच्या ठळक आकड्यांपेक्षा तें काम किती किफायतशीरपणें मिळविलें जातें, ही गोष्ट फारच अधिक महत्त्वाची असते ह्या दृष्टीनें कंपनीचें धोरण योग्य व विमेदारांच्या अंतिम हिताचेंआहे. कंपनीच्या विमा खाती फंडांत ह्या धोरणामुळेंच गेल्या वर्षी ४८ हजारांची भर पडूं शकून तो १ लक्ष, ४५ हजारांपर्यंत गेला आहे. कंपनीच्या व्यवस्थापकांचे दक्षतेस दैवी सहायहि मिळत आहे, कारण गेल्या तीन वर्षांत कंपनीकडे एकहि क्लेम दाखल झाला नाहीं. विमाव्यवसायाचा दीर्घ अनुभव असलेले श्री. एस. एन. आगाशे हे कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर असून त्यांचें कंपनीच्या पद्धतशीर प्रगतीबद्दल अभिनंदन करणें आवश्यक आहे.

## सोव्हिएट अर्थव्यवस्था कशी चालते ?

[ मास्को येथें गेल्या मार्चमध्यें भरलेल्या परराष्ट्रीय मंत्र्यांच्या परिषदेच्या कामकाजाचें वृत्त धाडण्यासाठीं बरेच ब्रिटिश व अमेरिकन बातमीदार तेथें गेले होते. यापैकीं कांहीं वार्ताहारांनीं सोव्हिएट अर्थव्यवस्थेबद्दल गैरसमजूत करून देणारीं वर्णनें पाठविल्याची तक्रार मॉस्कोमधील रशिअन पत्रकारांनीं केलेली आहे. रशिअन अर्थव्यवस्था रशिअन नागरिकांना कशी वागवते यासंबंधीं कांहीं माहिती ' सोव्हिएट वीकली ' या साप्ताहिकावरून पुढें दिली आहे. ]

रशिअन पत्रपंडित लिहितो, " ब्रिटिश वार्ताहारांना मॉस्कोव्हा हॉटेलमध्यें उतरण्यास जागा दिलेली होती. ही जागा देण्यांत त्यांची चांगली सोय व्हावी असा उद्देश होता. मॉस्कोंत असतांना आमच्या विषयीं चांगले बोलणाऱ्या वार्ताहारांनीं परत गेल्यावर अगदीं वेगळेंच लिहिण्यास प्रारंभ केला. उदा. ट्रेव्हार स्मिथ हा ' मेलबोर्न हेरल्ड ' चा वार्ताहर घ्या. यानें असें लिहिलें कीं रशिआंत क्रांति झाल्यापासून मास्कोंत फक्त मॉस्कोव्हा हॉटेल आणि कांहीं सरकारी इमारती येवढ्याच काय त्या नव्या बांधल्या गेल्या. वास्तविक या हॉटेलमधून परिषदेच्या जागीं जातांना दुतर्फा असलेल्या इमारती सगळ्या नव्या होत्या. १९२८ ते १९४१ इतक्या वर्षांत मास्कोंत ६ कोटी चौरस फूट रहाण्याची जागा बांधण्यांत आली. म्हणजे १९१७ सालापेक्षा ५० टक्के अधिक जागा बांधण्यांत आली. सोव्हिएट रशिआंत पगारांत फार विषमता आहे असेंही विधान कांहीं जणांनीं केले आहे. पगार व वेतनांतील तफावत ब्रिटनपेक्षा रशिआंत किती तरी अधिक आहे असें लिहिण्यापर्यंतही कित्येकांनीं मजल मारली. असे लिहितांना त्यांच्या डोळ्यासमोर बहुधा रशिआंतील कामगार मजुराकरितां निराळी शिधापद्धति व करपद्धति आहे, ती असावी. आमच्या देशांत समतेचा अर्थ वेगळा करण्यांत येतो. समता या शब्दानें आमच्याकडे संधीची समानता असा अर्थ केला जातो. रशिआंत शिक्षण, वैद्यकीय मदत व सामाजिक सुखसोयी सर्वांना मिळण्याची सोय केलेली आहे. उलट, कमी मिळकत असणाऱ्यांना या बाबतींत कांकणभर अधिकच सवलती देण्यांत येतात.

" युद्धकालांत सोव्हिएट रशिआंतील कुशल कामगार, हुषार सरकारी नौकर, एंजिनिअर, डॉक्टर्स इत्यादी लोकांवर कामाचा फार ताण पडला. या कामगारांच्या कर्तृत्वशक्तीवर देशाचें भवितव्य अवलंबून असल्यानें त्यांना युद्धकालांत इतर कामगारांपेक्षा अधिक सवलती देण्यांत आल्या, अधिक पगार देण्यांत आला हें खरें. पण या वाढलेल्या पगाराचा त्यांना फार फायदा मिळाला नाहीं. कारण देशांत वस्तूंचाच तुटवडा होता. १९४३ व ४४ सालांत दुकानांतून थोडाबहुत माल मिळूं लागला तेव्हां या सांठलेल्या पगाराचा त्यांना उपयोग करता आला. युद्ध संपल्यानंतर अधिक पगार मिळणाऱ्या लोकांना दिलेल्या सवलती कमी करण्यांत आल्या. त्यामुळें पगारांतील अंतर बरेंच कमी झालें आहे. कमी पैसे मिळविणाऱ्या लोकांचें जीवन युद्ध संपल्यापासून अधिक सुखाचें झालें आहे. कामाचे तास ८ च ठेवण्यांत आले आहेत. कमी केलेल्या सुट्या परत देण्यांत येत आहेत. युद्धांत न दिलेल्या सुट्यांबद्दल नुकसान भरपाई देण्यांत येत आहे. मोठ्या कारखान्यांतील कामगारांसाठीच फक्त चालविलेल्या दुकानांतून स्वस्त माल विकण्यांत येत आहे. मास्कोमधील श्रीमंती थाटाच्या होटेलचीं वर्णनें परदेशांत करण्यांत येतात. पण त्याच बरोबर १९४६ सालीं स्वस्त दरांत चहा व जेवण देणारीं हजारों चहागृहें व भोजनगृहें उघडण्यांत आलीं आहेत हें कोणी सांगत नाहीं. किंमतीबाबत सरकारचें धोरण असें आहे कीं, नागरिकांना लागणाऱ्या सामान्य वस्तूंच्या किंमती स्वस्त ठेवावयाच्या. या धोरणाप्रमाणें स्वयंपाकाचीं भांडीं, कपडे, साधें फर्निचर व कांचसामान यांच्या किंमती खूपच उतरविण्यांत आल्या आहेत. याच्या उलट थोड्याबहुत अंशानें चैनीच्या वस्तूंच्या किंमती तितक्याशा स्वस्त ठेवलेल्या नाहींत. उदा. जुनें कलाकुसरीचें फर्निचर, फरची कांतडी, पिण्याची दारू, मोटारी वगैरे. अशा रीतीनें ज्यांना अधिक पगार मिळतो त्यांना फारशा सवलती न देतां सामान्य नागरिकांचें जीवन अधिक समृद्ध करण्याचें प्रयत्न सोव्हिएट सरकार करींत आहे. "

---

### सुयांच्या उत्पादनांत ब्रिटन अग्रेसर

कपडे शिवण्यासाठीं लागणाऱ्या सुया, ही एक रोजच्या गरजेची वस्तू आहे. आंकडे शास्त्रज्ञांनीं असा हिशोब बसविलेला आहे कीं जगांतील प्रत्येक माणसागणिक दरवर्षीं ५ सुयांची गरज लागते. सुयांच्या बाजाराची एक मनोरंजक बाब अशी आहे कीं, या बाजारांत मागणीचे चढ–उतार झालेले गेल्या कित्येक वर्षांत कोणासही माहीत नाहींत. बाजार म्हटला म्हणजे त्यांत तेजी–मंदी आलीच, पण सुया मात्र ह्या नियमाला अपवाद ठरल्या आहेत. दुसऱ्या महायुद्धापूर्वीं सुयांचें उत्पादन व बाजार फक्त तीन राष्ट्रांच्या हातांत होता. तीं तीन राष्ट्रें म्हणजे ब्रिटन, जर्मनी आणि जपान हीं होत. आश्चर्याची पण खरी गोष्ट म्हणजे अमेरिका सुया उत्पादन करण्याच्या भानगडींत कधींच पडली नाहीं. ह्याचें कारण असें सांगण्यांत येतें कीं वरील तीन राष्ट्रें त्यांच्या भौगोलिक परिस्थितीमुळें सुयांची मागणी पुरविण्यास अधिक समर्थ होतीं. शिवाय, अमेरिकेला सुयांसाठी नवीन कारखाने उभारणें परवडलें नसावें. जपानमधील हिरोशिमा शहरांतील सुयांचे कारखाने आणि जर्मनींतील कारखाने युद्धांत उध्वस्त झाले असल्यानें आतां ह्या क्षेत्रांत फक्त ब्रिटनच उरला आहे. ब्रिटिश कारखान्यांतील प्रत्येक यंत्र दर तासाला ६० हजार सुया तयार करतें.

---

**पूर्व आफ्रिकेंत भुइमुगाची लागवड**—पूर्व आफ्रिकेंत यांत्रिक सहायानें भुइमुगाची लागवड करण्यासाठीं कलोनिअल डेव्हलपमेंट फंडानें ३० कोटि रुपयांची एक योजना आखली आहे. टांगानिका, केनिया व उत्तर ऱ्होडेशिया येथें ही लागवड केली जाईल.

---



# सावकारी नियंत्रण कायदा व ठेवी

## कायद्यांतील शब्दांचा ठेवीदारांना अनुकूल अर्थ

( लेखक: श्री. स. वा. दातार, बी. एससी., एलएल. बी. )

कोणताहि कायदा एकदां विशिष्ट शब्दांत मांडला गेला कीं त्यांतील शब्दांचा स्वानुकूल अर्थ लावून दाखविण्याची क्रिया सुरू होते. यामुळेंच कायद्याचे अर्थ लावणें हें एक मोठें शास्त्रच होऊन बसलें आहे.

सावकारी नियंत्रणाचा कायदा नुकताच प्रसिद्ध झाला आहे व त्याच्या प्राथमिक वाचनावरून लिमिटेड कंपन्यांकडे ठेवी ठेवण्यास परवान्याची जरूर नाहीं. भागीदारी वगैरे स्वरूपाच्या व्यावसायिकांकडे ठेवी ठेवावयाच्या असल्यास परवान्याची जरूर लागेल असा अर्थबोध होतो. हें खरें, परंतु त्या कायद्यांत अशीं दोन स्थळें आहेत कीं, त्यांचा अर्थ लावण्यावर या बाबतींतील परवाना घेणें न घेणेंचा प्रश्न अवलंबून राहील. हीं स्थळें विवाद्य आहेत हें मात्र लक्षांत ठेवावें. पहिला मुद्दा असा कीं, ठेवी या जादा, त्वरित वापरास आवश्यक नसलेल्या पैशाची सुरक्षित व किफायतशीर गुंतवणूक करण्यासाठीं ठेवल्या जातात. व्याज काढण्याचा अथवा सावकारीचा धंदा ( 'बिझिनेस ऑफ मनी-लेन्डिंग ' ) करण्याचा ठेवीदारांचा उद्देश नसतो. अशा स्थितींत त्यांना परवाना घेण्याची आवश्यकता उरत नाहीं; मग त्या ठेवी कंपनीकडे वा भागीदारी पेढीकडे कोठेंहि ठेवल्या जावोत.

दुसरा मुद्दा असा कीं, प्रस्तुत कायद्याचें कलम १० (२) ह्यामध्यें असें म्हटलें कीं रकम कर्जाऊ देणारानें लाविलेल्या एकाद्या दाव्यांत कोर्टाच्या असें दृष्टोत्पत्तीस आलें कीं रकम कर्जाऊ दिली तेव्हां वादीजवळ परवाना नव्हता तर सावकारीचा धंदा सुरू केल्यापासूनची सर्व थकलेली फी भरून वादी प्रस्तुत कायद्याखालील परवाना हजर करीपर्यंत कोर्टानें दाव्याचें काम तहकूब करावें. पण येथें असा प्रश्न उभा राहातो कीं, सावकारी धंदा कांहीं सुरू करण्याचा उद्देश नाहीं; फक्त जवळ सांठलेला जादा पैसा कोठेंतरी गुंतवावयाचा आहे; तर अशा ठिकाणीं फक्त तात्पुरता परवाना घ्यावयाचा कीं ठेव ठेवल्यापासून परवाना घेऊन तो सतत चालू ठेवावयाचा ?

सदर कायद्याच्या १० ( १ ) या कलमांत असें म्हटलें आहे कीं, एकाद्या दाव्यांत कोर्टाला असें दिसून आलें कीं, त्या दाव्यांतील रकम कर्जाऊ दिली गेली त्या वेळीं वादीजवळ प्रस्तुत कायद्याचे अन्वयें घेतलेला चालू परवाना नव्हता तर कोर्टानें वादीस हुकुमनामा देऊं नये. या कलमांतील ' दाव्यांतील कर्जाऊ रकम दिली गेली तेव्हां ' ( ॲट द टाइम द लोन वॉज ॲडव्हान्स्ड ) हे शब्द महत्त्वाचे आहेत. त्यावरून असा निष्कर्ष निघतो कीं, कोठेंहि एकादी ठेव वा कर्जाऊ रकम गुंतवावयाची असेल-तेव्हां त्या वर्षापुरत्या परवान्यासाठीं पांच रुपये खर्च केले म्हणजे भागेल. कर्जाची अथवा ठेवीची मुदत संपेपर्यंत सतत परवाना घेत राहण्याची आवश्यकता ह्या कलमांतील शब्दरचनेवरून दिसत नाहीं.

वरील दोन्हीहि मुद्दे ह्या कायद्याचा अर्थ अधिकृतपणें कसा लावला जाईल त्यावर अवलंबून असल्यामुळें तूर्त विवाद्य व अनिर्णीत आहेत.

सारांश, सावकारी नियंत्रण कायदा अंमलांत आला तरी खासगी वा जाहीर कंपन्यांकडे ठेवी ठेवण्यास कांहींहि प्रत्यवाय असणार नाहीं. भागीदारी पेढ्या व वैयक्तिक मालकीचे व्यवसाय यांचेकडे ठेवी ठेवावयाच्या झाल्यास मात्र, हा कायदा अंमलांत आल्यानंतर ( त्या आधीं नव्हे ) ठेवीदारांना ठेव ठेवण्यापूर्वी परवाना घ्यावा लागेल.

---

### दि बँक ऑफ इंडिया लि.

३० जून, १९४७ असेर संपलेल्या सहामाहींत वरील बँकेस रु. ३५,५६,७४२–१–५ नफा झाला. त्यावरील कर भरावयाचा आहे. गेल्या वर्षीच्या हिशेबांतून ओढलेले रु.७,२६,०४९–२–७ त्यांत मिळविले म्हणजे एकूण रु. ४२,८२,७९१–४–० होतात. डायरेक्टरांनीं त्याची वाटणी खालीलप्रमाणें केली आहे. १½ कोटि रुपयांच्या वसूल भांडवलावर ३० जून १९४७ अखेरच्या सहामाहीसाठी १२% ( प्रत्येक भागास ३ रु. ) करमाफ इंटेरिम डिव्हिडंड देण्यास ९,००,००० रु. लागून रु ३३, ८२, ७९१–४–० पुढील सहामाहींत ओढण्यांत आले. त्यांतून कर दिला जाईल. इंटेरिम डिव्हिडंडमध्यें दरभागास ४ आणे वाढ झाली आहे त्यावरून भागीदारांनीं विशेष निष्कर्ष काढूं नये; बँकेच्या शेअर खात्याचें काम सुलभ होण्याचे दृष्टीनें ही वाढ करण्यांत आली आहे, असा डायरेक्टरांनीं मुद्दाम खुलासा केला आहे.

---

### वारस असतांना विवाह करणारी पहिली ब्रिटिश राजकन्या

एलिझाबेथ राजकन्येचा लेफ्टनंट फिलिप माउंटबॅटनशीं विवाह ठरल्याचें जाहीर झालें आहे. एलिझाबेथ ही ब्रिटिश गादीची वारस आहे, म्हणजे राजास पुत्रसंतति नसल्यामुळें ह्या ज्येष्ठ राजकन्येस गादी मिळणार आहे. वारस राजकन्येचा विवाह ब्रिटिश इतिहासांत आजवर कधींच झालेला नाहीं. मेरी ट्यूडरनें गादीवर आल्यानंतर विवाह केला, एलिझाबेथ अविवाहित राहिली, मेरी स्टुअर्ट व ॲन ह्यांनीं त्यांचा पिता गादीवर येण्यापूर्वीच विवाह केला आणि व्हिक्टोरियानें राणी झाल्यावरच विवाह केला.

---

### सोडा ॲशच्या उत्पादनासाठी नवी कंपनी

सोडा ॲशच्या उत्पादनासाठी साउथ इंडिया केमिकल ॲंड अल्कली कॉर्पोरेशन लि. मद्रास, ही कंपनी स्थापन झाली आहे, तिला २½ कोटि रुपयांचें भांडवल उभारण्यास परवानगी मिळाली आहे.

---

**मुंबई म्युनिसिपॅलिटीचें ८¼ कोटींचें कर्ज**—मुंबई म्युनिसिपॅलिटीनें मुंबई सरकारची मंजुरी घेऊन ८¼ कोटि रुपयांचें कर्ज उभारण्याचें ठरविलें आहे. व्याजाचा दर ३¼% असून १ ऑगस्ट १९७७ रोजीं कर्जाची परतफेड केली जाईल. ८¼ कोटि रुपयांपैकी ७½ कोटींचा विनियोग मुं. इलेक्ट्रिक स. ॲंड ट्रॅ. कं. लि. खरीदण्याकडे केला जाईल. कर्जउभारणीचें काम रिझर्व्ह बँके आ[illegible] चालू आहे. संभाव्य अंडररायटर्सकडून कर्जरोख्यांची विक्रीची किंमत मागवून तिचे आधारावर ती किंमत निश्चित करण्यांत येत आहे. १ऑगस्ट रोजीं हें कर्ज बाजारांत मिळूं शकेल.

**सावंतवाडी को. बँक लि.**—वरील बँकेचा उद्घाटन समारंभ ता. ३० जून रोजीं मु. मां. सहकारी बँक लि. चे ऑनररी मॅनेजिंग डायरेक्टर श्री. वा पुं. वर्दे, बी. कॉम., ह्यांच्या अध्यक्षतेखालीं झाला. बँकेच्या पहिल्या डायरेक्टर बोर्डाचे चेअरमन डॉ. ह. शि. परुळेकर हे आहेत.

## विविध माहिती

**६१००० रुपयांचा फिरोदिया ट्रस्ट**—नगर जिल्ह्यांतील प्रसिद्ध वकील, पुढारी व मुंबई लेजिस्लेटिव्ह असेंब्लीचे स्पीकर श्री. कं. सो. फिरोदिया यांनीं बुधवार ता. ९।७।४७ रोजीं आपल्या मिळकतीपैकीं ६१००० रुपयांचा श्री. फिरोदिया ट्रस्ट करून तो रजिस्टर कचेरींत त्याच दिवशीं नोंदविला.

६१००० रुपयांपैकीं ११००० रुपयांच्या देणग्या रोख देणार असून त्या संस्थांची यादी ट्रस्टींजवळ दिली आहे. बाकी राहिलेले ५०००० रुपयांपैकीं दरसाल २००० रुपये खर्च व्हावे अशी त्यांची इच्छा आहे. दरसाल या ५०००० रुपयांवर दोन हजार व्याज आलें तर ठीक, नाहींतर कमी पडल्यास मूळ रकमेंतून २००० रुपयांची भरती होण्यासाठीं उचल करावी लागेल. जास्त व्याज आलें तरी दोन हजारच खर्च करून योग्य कारणीं लावावेत, अशी योजना आहे.

**अमेरिकेंतील गव्हाचें उत्पादन**—अमेरिकेंतील यंदाच्या गव्हाच्या पिकाइतकें मोठें पीक आजवर कधींच आलें नव्हतें. तेथील साखरेचें उत्पादनहि २० टक्यांनीं वाढलें आहे.

**मुसलमान व्यापाऱ्यांची परिषद**—हिंदुस्थान व पाकिस्तान अशी देशाची फाळणी झाल्यामुळें निर्माण होणाऱ्या परिस्थितीचा विचार करण्याकरितां ऑल इंडिया मुस्लीम चेंबर ऑफ कॉमर्स अँड इंडस्ट्रीनें मुसलमान व्यापाऱ्यांची एक परिषद सप्टेंबर अखेर बोलाविली आहे.

**स्टर्लिंग पौंडाची किंमत उतरविणार नाहींत**—ब्रिटिश स्टर्लिंग पौंडाची किंमत उतरविण्यांत येणार असून त्यामुळें सोन्याची किंमत चढणार अशी पसरलेली बातमी निराधार असल्याचें अधिकृत रीत्या जाहीर झालें आहे.

**ब्रिटिश मोटारींचें उत्पादन**—ब्रिटिश मोटार कारखान्यांतून मे, १९४७ मध्यें २७,५०० मोटारींचें उत्पादन झालें. एप्रिलचे मानानें हें उत्पादन ३,००० मोटारींनीं जास्त आहे.

**रिझर्व्ह बँकेची वार्षिक सभा**—रिझर्व्ह बँकेची १२ वी वार्षिक साधारण सभा ४ आगस्ट रोजीं कलकत्ता येथें भरणार आहे. बँकेच्या ऑडिटरांचा मेहनतांना प्रत्येकीं ७,५०० रु. करावा, अशी एका भागीदाराची सूचना सभेंत येणार आहे. सध्या प्रत्येक ऑडिटरास ५,००० रु. मिळतात.

**हिंदुस्थानांत विमानांचें उत्पादन**—हिंदुस्थानांत तयार झालेलें पहिलें विमान जानेवारी १९४८ मध्यें आकाशांत उडतांनां दिसेल, असें हिंदुस्थान एअर क्राफ्ट कंपनीच्या एका जबाबदार अधिकाऱ्यानें नुकतेंच सांगितलें. प्रारंभींच्या २० हिंदी विमानांचे प्रमुख भाग ग्रेट ब्रिटनमधून आणविण्यांत येतील, परंतु नंतर मात्र सर्व भाग येथें तयार होऊं लागतील. दरमहा पांच विमानांचें उत्पादन अपेक्षित आहे.

**चहाच्या रेशनमध्यें कपात**—ग्रेट ब्रिटनमध्यें चहाची तुटवडा भासूं लागल्याकारणानें चहाच्या रेशनमध्यें आणखी कपात करण्यांत आली आहे.

**कोळशाची जागतिक परिस्थिति**—अमेरिका खेरीज करून बाकी सर्वच देशांना कोळशाची चणचण भासत आहे. त्यांचा उत्पादनावर प्रतिकूल परिणाम होत आहे. हिंदुस्थानास पूर्वी दक्षिण आफ्रिकेकडून कोळसा मिळत असे तो आतां मिळत नाहीं. ऑस्ट्रेलियांत संप चालू आहेत. युरोपांतील कोळशाचें उत्पादन युद्धापूर्वींच्या मानानें २५% कमी आहे आणि तेथील देशच कोळशाच्या आयातीकडे टक लावून पहात आहेत. प्रत्यक्ष इंग्लंडमधील उत्पादनहि १८ टक्यांनीं घटलें आहे. अमेरिकेंतील उत्पादन पुष्कळ वाढलें असलें तरी इंग्लंड, युरोप, कॅनडा, इत्यादींकडे कोळसा पाठविणें तिला अधिक महत्त्वाचें आहे. कोळशाच्या अशा बिकट जागतिक परिस्थितींत हिंदुस्थानास स्वावलंबी होण्याखेरीज गत्यंतर नाहीं. कोळशाचें उत्पादन वाढविण्यावरच हिंदी औद्योगिक प्रगति बऱ्याच अंशीं अवलंबून राहाणार आहे.

**अमेरिकन कपाशीची निर्गत**—एप्रिल १९४७ अखेरच्या नऊ महिन्यांत अमेरिकेनें २६ लक्ष गाठी कपास निर्गत केली, त्यापैकी १९ लक्ष गाठी युरोपांतील देशांकडे गेल्या. जपान ह्या सर्वांत मोठ्या गिऱ्हाइकाकडे ५ लक्ष गाठी पाठविण्यांत आल्या. कपाशीच्या निर्गतीस दरपौंडास अर्धा सेंट अशी सबासिडी अमेरिकन सरकारनें अद्याप चालू ठेवली आहे.

**दि वेस्टर्न इंडिया ऑटोमोबाइल असोसिएशन**—वरील असोसिएशनच्या पटावर ९,३०६ सभासद आहेत आणि तिचा रिझर्व्ह फंड १ लक्ष, ८० हजार रु. झाला आहे. १९४६ सालीं रस्त्यावर गाड्या बंद पडल्या त्यांचे मदतीस ३,१०८ वेळा असोसिएशनचे मदतनीस गेले. एकूण ४२० ठिकाणीं असोसिएशनचे शिपाई गाड्या संभाळण्यासाठी उभे होते. असोसिएशनच्या पुणें शाखेतर्फे ६ ठिकाणीं शिपाई गाड्या संभाळतात. अहवालाचे वर्षीं असोसिएशनला वर्गणीचे रूपानें १,७०,३८९ रु. मिळाले.


गेल्या वर्षांतील स्पृहणीय यश—
हाच नव्या वर्षाचे कार्याला सुमुहूर्त—

**दि सुप्रीम म्यूच्युअल विमा कंपनी लि. पुणें २.**

| | | रुपये |
|---|---|---|
| आलेलें काम | : : | २७,२९,२५० |
| स्वीकृत काम | : : | २५,४४,७५० |
| पूर्ण काम | : : | २२,६३,००० |

अल्पावधींत मिळविलेल्या यशाची वरील आंकडेच ग्वाही देतील.

—एजन्सीसाठीं व विम्यासाठीं चौकशी करा—

व. न. म्हैसूर,
मॅनेजर

आमचे प्रमुख जाहिरात प्रतिनिधी
दत्तात्रय रामचंद्र कुलकर्णी
९६ नारायण पेठ, पुणें २.

## विविध माहिती

**चहाच्या' आयातीवर नियंत्रण**—हिंदुस्थान सरकारनें चहाच्या आयातीवर नियंत्रण ठेवण्याचें ठरविलें आहे. देशांत आयात होणाऱ्या मालांत अधिक जरूरीच्या वस्तूंना प्रथम प्राधान्य द्यावयाच्या सरकारच्या धोरणास अनुसरून चहा बाबत वरील धोरण स्वीकारण्यांत आलें आहे.

**फ्रान्समध्यें तेलाच्या खाणी**—स्पेन—फ्रान्सच्या सरहद्दीवर असलेल्या पिरीनीज पर्वताच्या फ्रान्सच्या ताब्यांतील भागांत तेलाच्या खाणींचा शोध लागला आहे. ह्या खाणी सुमारें ४,५०० फूट इतक्या खोलीवर असाव्या, कारण या खोलीवरच सशोधकांना पेट्रोलचा नैसर्गिक गॅस आढळून आला.

**मलबारांत सोनें सांपडूं लागलें ?**— मलबारमधील थेंकारा नांवाच्या खेड्याजवळील ओढ्यांतून व ओहोळांतून सोन्याचे कण असलेली रेती सांपडली असल्याचें समजतें. ह्या ओढ्यांतून सांपडणारी पांढरी वाळू गोळा करून त्यांतून प्रत्येक माणसाला दरदिवशीं १ रुपयापासून २० रुपयेपर्यंत मिळवितां येतील असें म्हणतात.

**हंगेरींतील बँकांचें राष्ट्रीयीकरण**—हंगेरीच्या संयुक्त सरकारांत सामील असलेल्या सर्व पक्षांची एक परिषद् भरून तींत हंगेरींतील बँकांचें राष्ट्रीयीकरण करण्याचें एकमतानें ठरविण्यांत आलें. बँकेंतील पराराष्ट्रीय भागीदारांच्या हितसंबंधांस संरक्षण देण्यांत येणार आहे असें समजतें.

**ब्रिटनमध्यें नवे कारखाने**—ब्रिटनच्या बोर्ड ऑफ ट्रेडनें जाहीर केलेल्या माहितीप्रमाणें ब्रिटन १२ कोटी, ३० लाख पौंड खर्चून बरेच नवे कारखाने उघडणार आहे. त्यांपैकीं ३६५ कारखाने आज चालू असून त्यांत ९० हजार कामगार काम करीत आहेत. युद्धपूर्व काळांतील बेकारी पुन्हां उद्भवूं नये म्हणून ही तरतूद करण्यांत आली आहे.

**रशिआला पोलाद देऊं नका**—अमेरिकेच्या पुढील वर्षीच्या अध्यक्षपदासाठी उभे रहाणारे संभाव्य उमेदवार मि. स्टॅसेन यांनीं अमेरिकेनें रशिआला पोलाद व तेल देण्याचें बंद करावें, असें एका भाषणांत सांगितलें.

**बिहारमध्यें औद्योगिक संशोधन शाळा**—बिहार प्रांतांत कोणते उद्योगधंदे काढतां येणें शक्य आहे, याचा अदमास घेण्यासाठी बिहार सरकारनें २० लाख रुपये खर्चून एक संशोधन केंद्र उभारण्याचें ठरविलें आहे. केंद्रातर्फे उद्योगपतींना सल्ला मिळणार आहे.

**युरोपला किती मदत पाहिजे**—रशिआ सोडून बाकीच्या युरोपला गेल्या तीन वर्षांत २५ कोटी पौंडांची मदत करावी लागेल असा अंदाज अमेरिकन सीनेटच्या परराष्ट्रीय समितीनें केला आहे. ही मदत करण्यांतील पहिलें पाऊल म्हणून जर्मनीच्या व जपानच्या चालू उत्पादनांतून नुकसानभरपाई देण्याचें बंद करावे असेंहि समितीनें सुचविलें आहे.

**हिंदुस्थानला कॅनडाची मदत**—कॅनडाच्या युद्धकालीन औद्योगिक खात्यांतील एक अधिकारी मि. थॉमस ब्रुक्स यांनीं मुंबईतील एका भाषणांत कॅनडा हिंदुस्थानच्या औद्योगीकरणास मदत करण्यास तयार असल्याचें सांगितलें.

**हिंदुस्थान-जपान व्यापार**—ऑगस्ट १ नंतर २९ खाजगी हिंदी व्यापाऱ्यांना जपानला व्यापार करण्यासाठी जाऊं देण्यांत येणार आहे असें अधिकृत रीत्या जाहीर करण्यांत आलें आहे.


# कृष्णा शुगर मिल्स लिमिटेड

**डिस्टिलरी लवकरच सुरू होणार**

**ठराविक मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.**

**६% क्युम्युलेटिव्ह प्रेफरन्स शेअर्स विकणें आहेत.**

**—संचालक मंडळ—**

रावबहादुर व्ही. व्ही. यारगोप, बी. ए., एलएल. बी., दिवाण, मिरज ज्यूनिअर स्टेट; श्री. डी व्ही. गर्दे, बी. ए., एलएल. बी., डिस्ट्रिक्ट जज्ज व हुजूर चिटणीस, मिरज ज्यूनियर स्टेट; श्री. एस. एस. निसळ, अहमदनगर; श्री. एन. एस. गोडबोले, पुणें; श्री. के. बी. देसाई, कोल्हापूर; सरदार व्ही. बी. महागांवकर, कोल्हापूर; राजा बी. एल. सरदेसाई, वंटमुरी; दिवाणबहादुर एस. डी. मानवी, गदग; श्री. एस. जी. मराठे, बी.ई., पुणें; श्री. बी. बी. पोतदार, बी.ए., एलएल.बी., बेळगांव; सरदार के. आर. विंचूरकर, (एक्स–ऑफिशिओ) पुणें. अधिक माहितीसाठी लिहा—

कृष्णा–कित्तूर, जिल्हा बेळगांव. | विंचूरकर आणि कंपनी, मॅनेजिंग एजंटस्.

दी

# बँक ऑफ कोल्हापूर, लि.

*(कोल्हापूर येथें सन १९२६ सालीं स्थापन झालेली व भागीदारांची मर्यादित जबाबदारी असलेली.)*

एच. एच. दी छत्रपति महाराजासाहेब ऑफ कोल्हापूर यांचे सरकारचे आश्रयाखालील.

| | | |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. | ४०,०६,५०० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | रु. | २०,२६,००० |
| भरलेलें (३०–६–४७) | रु. | ३,०५,४७० |
| रिझर्व्ह (३०–६–४७) | रु. | ५,८६,६६० |

एकूण खेळतें भांडवल रु.१,००,००,००० हून अधिक

मुख्य कचेरी—बँक ऑफ कोल्हापूर बिल्डिंग, लक्ष्मीपुरी–कोल्हापूर.

शाखा : संस्थानांतील:—(१) शाहुपुरी–कोल्हापूर, (२) गुजरी–कोल्हापूर, (३) जयसिंगपूर, (४) इचलकरंजी, (५) पेठ–वडगांव, (६) मलकापूर, (७) गडहिंग्लज. संस्थानाबाहेरील:—(८) मुंबई, (९) निपाणी (जि. बेळगांव)

★ चालू, सेव्हिंग्ज व मुदतीच्या ठेवी स्वीकारल्या जातात.

★ योग्य तारणावर कर्जें, ओव्हरड्रॉफ्टस व कॅश क्रेडिटस दिलीं जातात. व्याजाचे दर पत्रद्वारें.

※ मौल्यवान चीजवस्तु सुरक्षित ठेवणेसाठी हेड ऑफिसमध्यें सेफ डिपॉझिट व्हॉल्टची उत्तम व्यवस्था.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

व्ही. प. सावंत, अॅ. मॅनेजर


हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व रा. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजीनगर, (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.